# सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी समुपदेशनासाठी विशेष सोय

पुणे । सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आधार देण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाऊंडेशन सातारा येथील रुबी हॉल हेल्थ केअरमध्ये विशेष सल्लाकेंद्र उघडणार आहे. येथे या मुलांना दूर-पुनर्वसन कार्यक्रमाचे लाभ घेता येतील, तसेच केईएम रुग्णालय, पुणे येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे मिळविता येईल.

बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी घोषणा फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी केली. सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेयर वितरण कार्यक्रमाचे सातारा येथे आयोजन करण्यात आले.

यावेळी खासदार उदयनराजे भोसले, दमयंतीराजे भोसले, साताऱ्याचे जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, फारोख कूपर आणि झाल कूपर, डॉ. परवेज ग्रँट, भारती पाटील यावेळी उपस्थित होते.